

दैनिक
अचूक वेध, अचूक बातमी
अक्षराज
संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध
Email : newsaksharaj2021@gmail.com

खालील (क्यू आर कोड) स्कॅन करा...
आणि अक्षराज मीडियाच्या व्हाट्सअप चॅनल ला
फॉलो करा व मिळवा सर्व घडामोडींचे अपडेट्स
एकाच वेळी एकाच ठिकाणी...
कृपया इथे स्कॅन करा
Plz Scan Here

वर्ष : ०६ | अंक : ९६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, बुधवार, दि.१८ नोव्हेंबर २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

स्वामींच्या दरबारात ‘भेसळी’चा प्रसाद! ८५० किलो मिठाईचा साठा जप्त

अक्षराज : वृत्तसंकलन

दि.१७, सोलापूर : श्री स्वामी समर्थ दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांना सुरक्षित आणि दर्जेदार अन्नपदार्थ उपलब्ध व्हावेत, या उद्देशाने अन्न व औषध प्रशासनाने पेढा उत्पादक आणि मिठाई विक्रेत्यांविरुद्ध धडक कारवाई केली आहे.

या कारवाईत अडीच लाखांचा एकूण ८५० किलो पेढा व मिठाईचा साठा जप्त करण्यात आला. तसेच चार आस्थापनांना व्यवसाय बंद ठेवण्याचे आदेश देण्यात आले असून, मुख्य



पुरवठादाराचा अन्न परवाना आणि अन्य एका आस्थापनेची नोंदणी निलंबित करण्यात आली आहे.


अडीच लाखांचा मिठाई पेढा जप्त

एफडीए पथकाने अक्कलकोट येथील मुख्य मिठाई पुरवठादार रंगोली स्वीट मार्टचे समीर बडेसाहब मकानदार यांच्या आस्थापनेत अस्वच्छ परिस्थितीत साठवणूक , लेबलविषयक नियमांचे उल्लंघन, अन्न सुरक्षा व मानके नियमांतील तरतुदींचे उल्लंघन तसेच मिठाईचा दर्जा निकषांनुसार नसल्याचा संशय आढळून आला . या ठिकाणाहून ३९८ किलो कंदी पेढा आणि ४३१ किलो स्वीट हलवा असा एकूण ८२९ किलो साठा जप्त करण्यात आला. या साठ्याची किंमत २ लाख ५० हजार २० रुपये आहे. या कारवाईमुळे अक्कलकोटम धील मिठाई उत्पादक, विक्रेत्यांचे धाबे दणाणले आहेत.

चार दुकाने बंदचा आदेश

स्वामी समर्थ मंदिरासमोरील समर्थ स्वीट स्टॉल, पाटील स्वीट शॉप, रंगोली स्वीट मार्ट, सलीम मकानदार पेढा स्टॉल ही आस्थापने बंद करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. याशिवाय रंगोली स्वीट मार्ट, या मुख्य पुरवठादाराचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे. तसेच मे. गुरुकृपा पूजा भंडार , स्वामी समर्थ मंदिरासमोर, अक्कलकोट या आस्थापनेची नोंदणी निलंबित करण्यात आली आहे. कंदी पेढा व स्वीट हलव्याचे नमुने प्रयोगशाळेतील विश्लेषणासाठी घेण्यात आले आहेत. तसेच या आस्थापनेचा अन्न व्यवसाय परवाना निलंबित करण्यात आला आहे. ही कारवाई सहआयुक्त (अन्न) श्रीकांत करकळे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक आयुक्त एस. ई. देसाई, अन्न सुरक्षा अधिकारी एखंडे आणि हिरेमठ यांच्या पथकाने केली आहे.

८ दिवसांपासून राजणगाव मशिद अंधारात ! महावितरणच्या गलथान कारभाराने शेतकरी त्रस्त



अक्षराज : राजकुमार इकडे

दि.१७, सुपा (अहिल्यानगर) : पारनेर तालुक्यातील सुपा पंचक्रोशीतील राजणगाव मशिद परिसरात महावितरणच्या गलथान कारभारामुळे गेल्या आठ दिवसांपासून आजतागायत रात्रीचा वीजपुरवठा खंडित आहे. विशेष म्हणजे रात्रीच्या वेळी सिंगल फेज वीजदेखील उपलब्ध होत नसल्याने संपूर्ण परिसर अंधारात बुडाला आहे. महावितरणच्या या भोंगळ कारभाराचा फटका सर्वसामान्य नागरिकांसह शेतकरी वर्गाला बसत आहे.

एकीकडे रात्रीच्या वेळी चोरी आणि घरफोड्यांच्या घटनांची भीती वाढली आहे. पोलिस यंत्रणेकडून शेतकरी वर्गाला सावध राहण्याचा इशारा दिला जात असताना, दुसरीकडे परिसरात रात्रीची वीजच नसल्याने नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. अंधाराचा फायदा घेऊन चोरट्यांचे धाडस वाढण्याची भीती ग्रामस्थ व्यक्त करत आहेत.

दुसरीकडे पावसाने पाठ फिरवल्याने पाण्याचे संकट गंभीर बनले आहे. पिकांना पाणी द्यायचे कसे, जनावरांची तहान भागवायची कशी, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा आहे. शेतकऱ्यांनी कष्टाने सांभाळलेल्या गायी, म्हशी, शेळ्या आणि मेंढ्यांचे पालनपोषण करणेही कठीण झाले आहे. अशा बिकट परिस्थितीत वीजपुरवठ्याचा लपंडाव सुरू असल्याने शेतकऱ्यांचे जगणेच अवघड झाले आहे.

शेतकऱ्यांनी शेती करायची, जनावरे जगवायची की रात्री स्वतःच्या घराची सुरक्षा करायची? असा संतप्त सवाल परिसरातील शेतकरी उपस्थित करत आहेत.

महावितरणच्या अधिकाऱ्यांनी या परिस्थितीची तातडीने दखल घेऊन राजणगाव मशिद परिसरातील रात्रीचा सिंगल फेज वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी ग्रामस्थ आणि शेतकरी वर्गातून होत आहे.

वीजपुरवठा सुरळीत करणे ही महावितरणची जबाबदारी असताना आठ दिवसांपासून अंधाराचे साम्राज्य कायम का? शेतकऱ्यांच्या अडचणींकडे महावितरणचे अधिकारी आणखी किती दिवस दुर्लक्ष करणार, असा सवाल उपस्थित होत आहे.

महावितरणच्या कारभाराने शेतकऱ्यांच्या सहनशीलतेचा अंत पाहू नये; अन्यथा या प्रश्नावर शेतकरी रस्त्यावर उतरल्यास त्याला जबाबदार कोण

? असा प्रश्न राजणगावचे समाज सेवक संपत कदम यानी विद्युत महावितरणाला लेखी निवेदनातुन विचारला आहे.

११ वर्षांच्या रुद्रची २१ किलोमीटर हाफ मॅरेथॉनमध्ये ऐतिहासिक झेप

अक्षराज : अशोक लोणीकर

दि.१७, मुखेड (नांदेड) : देगलूर येथील पोतदार इंग्रजी माध्यमाच्या शाळेत शिकणारा रुद्र रातोळीकर याने बीड येथे आयोजित केलेली मॅरेथॉन स्पर्धा बालाघाटच्या डोंगररांगांत आपल्या चमकदार कामगिरीमुळे देगलूर परिसरात कौतुकाचा वर्षाव होताना दिसुन येत आहे.

६२७ मीटर कमाल उंचीच्या आव्हानात्मक म ार्गावर धावण्याचा विलक्षण पराक्रम रुद्र रातोळीकर याने केला आहे. या पराक्रमाणे महाराष्ट्राच्या क्रीडा विश्वाचे लक्ष वधले आहे.

रुद्रने वयाच्या अवघ्या अकराव्या वर्षी २१ किलोमीटरचे अंतर पार करुन एक मोठे आव्हान निम र्ण केले आहे. ही आयोजन मॅरेथॉन डोंगराळ वाटा, तीव्र चढ-उतार आणि तब्बल ६२७ मीटर कमाल उंची असलेल्या बालाघाटच्या अत्यंत आव्हानात्मक मार्गावर ही हाफ मॅरेथॉन अवघ्या १ तास ५७ मि निटांत पूर्ण करुन जिद्द, चिकाटी आणि असामान्य धावक्षमता यांचा अद्भुत संगमच्च दिसत आहे.

बीड येथे पार पडलेल्या प्रतिष्ठेच्या बालाघाट हिल मॅरेथॉनमध्ये देगलूरच्या रुद्र रातोळीकरने आपल्या या अफलातून कामगिरीने क्रीडाप्रेमींचे लक्ष वेधून घेतल्यामुळे परिसरातुन कौतुकाचा वर्षाव होत आहे.

रुद्रने ही हाफ मॅरेथॉन १ तास ५७ मिनिटांत पूर्ण करून प्रतिष्ठेचा ‘सब-टू’ टप्पा गाठला. विशेष म्हणजे, महाराष्ट्रातील सर्वात कमी वयात २१ किलोमीटरची हाफ मॅरेथॉन दोन तासांच्या आत पूर्ण करणाऱ्या धावपटूंपैकी एक म्हणून त्याच्या या काम गिरीची विशेष चर्चा होत आहे.

बालाघाटच्या डोंगरांवर जिद्दीची मोहोर!

बालाघाट हिल मॅरेथॉन ही केवळ धावण्याची स्पर्धा नाही, तर प्रत्येक धावपटूच्या शारीरिक आणि



मानसिक क्षमतेची कसोटी पाहणारे आव्हान आहे. ६२७ मीटर कमाल उंचीचा टप्पा, सतत बदलणारा भूप्रदेश, कठीण चढ आणि वेगवान उतार अशा परिस्थितीत धावण्याचा वेग आणि सातत्य टिकवून ठेवणे अत्यंत महत्त्वाचे असते.

अशा आव्हानात्मक परिस्थितीत अवघ्या अकरा वर्षांच्या रुद्रने २१ किलोमीटरचा पल्ला १ तास ५७ मि निटांत गाठला. त्याच्या या कामगिरीने बालवयातील क्रीडा प्रतिभेची ताकद अधोरेखित केली आहे.

नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील पोतदार इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षण घेणारा रुद्र हा अभ्यासाबरोबरच धावण्याच्या क्षेत्रातही उल्लेखनीय प्रगती करीत आहे.

रुद्रच्या या यशामागे नियमित सराव, शिस्तबद्ध दिनचर्या आणि सातत्यपूर्ण मेहनतीची मोठी साधना आहे. देगलूर महाविद्यालयाच्या मैदानावर तो दररोज धावण्याचा सराव करतो. आठवड्याला तब्बल ४० ते ५० किलोमीटर धावण्याचा सराव करून तो आपली सहनशक्ती आणि धावण्यातील कौशल्य विकसित करीत आहे.

धावण्याबरोबरच शारीरिक क्षमता आणि तंदुरुस्ती वाढविण्यासाठी तो आठवड्यातून एकदा ३० ते ५० किलोमीटर सायकलिंगचा सराव करतो. याशिवाय देगलूर येथील जिया फिटनेस सेंटरमध्ये आठवड्यातून तीन वेळा फिटनेस प्रशिक्षण घेतो.

पुणे इंटरनॅशनल हाफ मॅरेथॉनपासून बालाघाटपर्यंतचा प्रेरणादायी प्रवास!

रुद्रने यापूर्वी पुणे इंटरनॅशनल हाफ मॅरेथॉन २०२५ आणि लातूर हाफ मॅरेथॉनमध्ये सहभाग घेऊन २१ किलोमीटरचे अंतर पूर्ण केले आहे. प्रत्येक स्पर्धेतून अनुभव घेत, स्वतःच्या क्षमतेला नवी दिशा देत त्याने धावण्याच्या क्षेत्रात आपली वाटचाल सुरू ठेवली आहे. बालाघाटमधील १ तास ५७ मिनिटांची काम गिरी ही त्याच्या याच सातत्यपूर्ण प्रयत्नांची उल्लेखनीय परिणती आहे.

एका बालकाच्या पावलांनी आज २१ किलोम ीटरचा पल्ला गाठला; पण त्या पावलांमध्ये उद्याच्या असंख्य स्वप्नांची चाहूल दडलेली आहे. देगलूरच्या मातीतून उगवलेली ही क्रीडा प्रतिभा भविष्यात म हाराष्ट्राचे नेतृत्व केल्याशिवाय राहणार नाही अशी अपेक्षा परिसरातील नाडरिकानी व्यक्त करत आहेत. रुद्र शिवाय देगलूर चे रनर बालाजी आउलवार यांनी एक तास सत्तावन मिनिटात पूर्ण केले ऋषिकेश जाधव यांनी एक तास सेहचाळीस मिनिटात पूर्ण केली.

डी जी रातोळीकर यांनी दोन तास चाळीस मि नीटात पूर्ण केली. रुद्र रातोळीकरच्या या उल्लेखनीय यशाबद्दल त्याचे, त्याच्या पालकांचे, पोतदार इंग्लिश स्कूल, देगलूर महाविद्यालय आणि जिया फिटनेस सेंटरमधील मार्गदर्शकांचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे.

कॅनालच्या पाण्यात वाघाचा मृत्यू ! वरोरा वनपरिक्षेत्रात खळबळ



अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१७, वरोरा (चंद्रपूर) : वरोरा वनपरिक्षेत्रांतर्गत टेमुर्डा उपक्षेत्रातील रामपूर नियतक्षेत्रात कॅनालमध्ये एका मृत वाघाचे शव आढळून आल्याने वनविभागात खळबळ उडाली आहे. सोमवार, १६ नोव्हेंबर रोजी दुपारी ३.१५ वाजताच्या सुमारास फत्तापूर-बारवा शिवारालगत असलेल्या कॅनालमध्ये हा मृत वाघ आढळला. वाघाच्या मृत्यूचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसून, या घटनेमुळे वन्यजीवप्रेमींमध्येही चिंता व्यक्त केली जात आहे.

घटनेची माहिती मिळताच वरोरा वनपरिक्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिकारी सुनील मडावी, टेमुर्डी क्षेत्रसहाय्यक वितेश चव्हाण, रामपूरच्या वनरक्षक पुनमसिंग बम्हनात यांच्यासह वनकर्मचाऱ्यांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थितीची पाहणी करून वरिष्ठ अधिकाऱ्यांना घटनेची माहिती देण्यात आली.

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता चंद्रपूर वनविभागाचे सहाय्यक वनसंरक्षक विकास तरसे, एनटीसीए प्रतिनिधी बंडू धोतरे, पीसीसीएफ प्रतिनिधी मुकेश भांदककर तसेच वनविभागाचे पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. कुंदन पोडशेलवार आणि आनंदवन येथील पशुवैद्यकीय अधिकारी डॉ. महेश बिबटे यांनी घटनास्थळी भेट देऊन मृत वाघाची पाहणी केली.

शवविच्छेदनातून उलगडणार मृत्यूचे गूढ !

घटनास्थळावरील प्राथमिक पाहणीनंतर मृत वाघाचे शव पुढील तपासणी व शवविच्छेदनासाठी चंद्रपूर येथील ट्रान्झिट ट्रीटमेंट सेंटर (टीटीसी) येथे हलविण्यात आले आहे. मंगळवार, १७ नोव्हेंबर रोजी शवविच्छेदन करण्यात येणार असून, त्यानंतरच वाघाच्या मृत्यूचे नेमके कारण स्पष्ट होणार आहे. वाघाचा मृत्यू नैसर्गिक कारणाने झाला की अन्य काही कारणामुळे, याबाबत सध्या कोणताही निष्कर्ष काढण्यात आलेला नाही. वनविभागाकडून या प्रकरणाचा पुढील तपास सुरू आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील व्याघ्रसंपदेच्या दृष्टीने महत्त्वाच्या असलेल्या या घटनेत शवविच्छेदन अहवालाकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

सीटीपीएस मधील ६०० किलो लोखंडी साहित्य चोरीचा पर्दाफाश !

६ आरोपी ताब्यात ; भंगार व्यावसायिकाचाही समावेश

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१७, चंद्रपूर : चंद्रपूर येथील सीटीपीएस दुर्गापूर परिसरातून सुमारे ६०० किलो लोखंडी साहित्य चोरी झाल्याचा गुन्हा स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने उघडकीस आणला आहे. गुप्त बातम ीदाराकडून मिळालेली माहिती आणि परिसरातील सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे पोलिसांनी या प्रकरणातील एकूण सहा आरोपींना ताब्यात घेतले आहे. स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपूर पथकाने दिनांक १६ नोव्हेंबर २०२६ रोजी ही कारवाई केली.



याप्रकरणी पोलीस स्टेशन दुर्गापूर येथे गुन्हा रजिस्टर क्रमांक ४५०/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ३०३(२), ३(७) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. या प्रकरणात पोलिसांनी ताब्यात घेतलेल्या आरोपींमध्ये दुर्गाप्रसाद दुकालु यादव (वय ४०, रा. सुमित्रानगर, चंद्रपूर), संजय जोहरी ठाकूर (वय ३१), नारद भगवानसिंग निशाद (वय ४०), नजीर उस्मान शेख (वय ३९), शेख अहमद शेख हसन (वय ४०) आणि शेख इम्रान शेख बिस्मीलाह (वय ३६, रा. तुकूम, चंद्रपूर) यांचा समावेश आहे. यामध्ये एका भंगार व्यावसायिकाचाही समावेश असल्याची माहिती पोलिसांनी दिली आहे.

ताब्यात घेतलेल्या सर्व सहा आरोपींना पुढील तपासासाठी पोलीस स्टेशन दुर्गापूर यांच्या स्वाधीन करण्यात आले आहे. या चोरीच्या गुन्ह्यात आणखी काही बाबी समोर येतात का, याबाबत पुढील तपास सुरू आहे. पोलिसांनी या कारवाईत १५ नग लोखंडी बिटर आर्म हँगर असेम्बली जप्त केल्या आहेत. या साहित्याचे एकूण वजन अंदाजे ६०० किलो असून, त्याची किंमत सुमारे १२ हजार रुपये असल्याचे सांगण्यात आले आहे.

सदर कारवाई स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांच्या नेतृत्वाखाली उपविभाग चंद्रपूर पथकाने केली.



देवदर्शन की दंडुकेशाही?

देवाच्या दारात भाविकाला धक्काबुक्की, शिवीगाळ वा मारहाणीचा 'प्रसाद' मिळणे ही बाब आपल्याकडे नवी नाही. महाराष्ट्रासह देशातील कोणतेही राज्य त्याला अपवाद नाही. परंतु, सातत्याने एकाच धर्मस्थळावर आणि जेथे काहीच महिन्यांत कोट्यवधी भाविक येणार आहेत, तेथेच वारंवार असे प्रसंग उद्भवत असतील तर तो नक्कीच गंभीर चिंतेचा आणि राष्ट्रीय मुद्दाच. ऐन दिवाळीत तीर्थनगरी त्र्यंबकेश्वरमध्ये परगावच्या भाविकांना झालेल्या मारहाणीच्या घटनेने भाविकांच्या सुरक्षेसह धार्मिक स्थळांवरील दंडेलशाहीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. मारहाण झालेल्या भाविकांमध्ये महिलाही होत्या आणि महिला सुरक्षारक्षकालाही मारहाण झाल्याची तक्रार दाखल झाल्याने भाविकांच्या वर्तनाबाबत साशंकता व्यक्त होणे साहजिकच! चूक कोणाची, हे चौकशीत स्पष्ट होईल किंवा नेहमीच्या शिरस्त्याप्रमाणे होणारही नाही; परंतु, देवदर्शनाची व्यवस्था इतकी तणाव अन् संघर्षाची का होते, ज्यांच्याकडे देवस्थानाची जबाबदारी आहे ती मंडळी नेमके काय करतात, की ही संपूर्ण व्यवस्थाच मुजोर तर बनली नाही ना, याचा एकदाचा साक्षमोक्ष लागावा. राज्य सरकारने हीच उचित वेळ मानून या प्रश्नांची तड लावावी; अन्यथा सिंहस्थ कुंभमेळ्यात यापेक्षा अनुचित प्रसंग घडून त्र्यंबकेश्वरसह संपूर्ण राज्याचीच बदनामी होण्याचा धोका संभवतो. अन्य कोणत्या चांगल्या गोष्टींपेक्षा दर्शनबारीत सातत्याने होणाऱ्या हाणामाऱ्या आणि गैरसोयींमुळे त्र्यंबकनगरी हमखास चर्चेत असते. भाविकांशी गैरवर्तन व मारहाणीच्या वर्षभरात डझनभरापेक्षा अधिक घटना तेथे घडल्या आहेत. दर्शनासाठी पाच-सहा तास ताटकळावे लागते. पिण्याच्या पाण्याची गैरसोय, स्वच्छतागृहांचा अभाव, बसण्याची जागा नाही, प्रतीक्षा वेळेची माहिती नसणे असले प्रकार नित्याचेच. कंटाळलेला भाविक गर्भगृहापर्यंत येईस्तोवर घायकुतीला येतो. तो उंबऱ्यावर डोके टेकवतो, तोच सुरक्षारक्षकांनी त्याला बाजूला केलेले असते. या रेटारेटीत एखाद्याचा संयम सुटला की वाद उद्भवतो. महाराष्ट्र सुरक्षा दल (एमएसएफ) आणि मंदिराचे सुरक्षारक्षक मग अक्षरश: तुटून पडतात. मंदिर परिसर असा युद्धभूमीसारखा दिसू लागणे ही तीर्थक्षेत्रासाठी लाजिरवाणी बाब. श्रद्धेपोटी भाविकाकडून मंदिरात काही वेळा रेंगाळण्याच्या चुका घडतात. परंतु, त्याला गंभीर मारहाण करायची, हा कोणता कायदा? काही महिन्यांपूर्वी एका भाविकाला झालेल्या मारहाणीची दृश्यफित व्हायरल झाल्यानंतर देशभरातून संताप व्यक्त झाला होता, त्यानंतरही पुन्हा तशाच घटनांची पुनरावृत्ती घडणे दुर्दैवी. दर्शन व्यवस्थेभोवती निर्माण झालेल्या कथित दलालीच्या साखळीने तर मंदिर व्यवस्थेचे पावित्र्यच धोक्यात आणले आहे. गंध लावणाऱ्यांपासून पुजारी, काही विश्वस्त, एजंट आणि स्थानिक हितसंबंधांपर्यंत या गैरकारभाराचे धागेदोरे पोहोचतात. मधल्या काळात 'कॅश फॉर दर्शन' हा घोटाळाही बराच गाजला. विश्वस्त व पदाधिकाऱ्यांतील अंतर्गत कुरघोडी आणि चढाओढीच्या राजकारणाने कळस गाठल्याने एका विश्वस्ताला तुरुंगाची हवाही खावी लागली. तरीही दर्शन व्यवस्थेत सुधारणा होण्याऐवजी ती अधिक बिघडली. विभागीय आयुक्तांनी केलेल्या चौकशीत बरीच गंभीर निरीक्षणे नोंदवली जाऊनही दुर्दैवाने विशेष उपाययोजना केल्या गेल्या नाहीत. नाही म्हणायला मंदिराचे अधिपत्य जिल्हा न्यायाधीशांकडून धर्मादाय आयुक्तांकडे गेले. परंतु, ती केवळ खांदेपालट ठरली. धर्मादाय आयुक्तांनी नेमकी कोणती व्यवस्था उभी केली, याची माहिती आधी द्यावी. सोबत देणग्या आणि उत्पन्नाच्या तपशिलासह भाविकांना येणाऱ्या अनुभवाचा हिशेबही सार्वजनिक व्हावा. मुजोर सुरक्षारक्षकांना शिस्तीबरोबर संवेदनशीलतेचे प्रशिक्षण देणेही आवश्यकच. गर्दीचे नियोजन दंडुक्याने नव्हे, तर सर्वसमावेशक प्रणालीने होते, हे ध्यानात घ्यायला हवे. भाविकांनीही सणाच्या दिवशीच दर्शन झाले पाहिजे, या मानसिकतेतून बाहेर पडून संयम, शिस्त आणि सहकार्य अंगी बाणवावे. कारण वाहतूक, पार्किंग, निवास, अन्नछत्र, स्वच्छता, दर्शनबारी, सुरक्षा आणि वैद्यकीय सुविधा यांवर प्रचंड ताण येतो. रांगा तोडणे, विशेष प्रवेशाचा आग्रह, गर्भगृहात रेंगाळणे, कर्मचाऱ्यांशी वाद हे चुकीचेच. परंतु, अशा वर्तनाचा आधार घेऊन विद्यमान व्यवस्थेला वैधतेचे प्रमाणपत्र बहाल करता येणार नाही.

त्र्यंबकेश्वर मंदिर व्यवस्थापनाबाबत एकूणात नव्याने विचार व्हावा. आवश्यक असेल तर कायद्यात दुरुस्ती करून शिर्डीप्रमाणे पूर्णवेळ सक्षम आयएएस अधिकारी नेमावा, जेणेकरून कारभारावर सरकारचा वचक राहू शकेल. श्रद्धेच्या नावाखाली पैसा, ओळख आणि पद यांना प्राधान्य मिळू लागले की, धार्मिकस्थळांचे पावित्र्यच मलिन होत असते. त्यामुळे हा गोंधळ लवकर निस्तरला न गेल्यास त्याची किंमत तीर्थनगरीसह संपूर्ण राज्यालाही मोजावी लागू शकते. शेवटी धर्मस्थळांची अर्थव्यवस्था येणारे भाविक आणि दानधर्मावरच चालते, हे विसरता कामा नये.

- श्याम ठाणेदार

कॉर्पोरेट हेरगिरीचा धोकादायक हनी ट्रॅप!

आजचे युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि माहितीचे युग म्हणून ओळखले जाते. कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय), संगणक, इंटरनेट आणि डिजिटल तंत्रज्ञानामुळे जग झपाट्याने बदलत आहे. या तंत्रज्ञानामुळे मानवी जीवन अधिक गतिमान आणि सुविधाजनक झाले असले, तरी त्याचबरोबर राष्ट्रीय सुरक्षा, औद्योगिक गोपनीयता आणि आर्थिक हितसंबंधांसमोर नवी आव्हानेही उभी राहिली आहेत. विशेषतः कॉर्पोरेट हेरगिरीसाठी वापरले जाणारे 'हनी ट्रॅप' हे एक अत्यंत गंभीर आणि धोकादायक आव्हान बनले आहे.

हनी ट्रॅप म्हणजे एखाद्या व्यक्तीला प्रेमाचे, मैत्रीचे किंवा जवळिकीचे आमिष दाखवून भावनिक जाळ्यात ओढणे आणि त्याच्याकडून गोपनीय माहिती मिळवणे. पूर्वी हेरगिरीसाठी प्रत्यक्ष भेटीगाठी, गुप्त संदेश आणि आर्थिक प्रलोभनांचा वापर केला जात असे. मात्र, आता सोशल मीडिया, व्हॉट्सअॅप, फेसबुक, लिंक्डइन आणि इतर डिजिटल माध्यमांचा वापर करून हेरगिरीचे जाळे विणले जात आहे. आकर्षक व्यक्तिमत्त्व, बनावट ओळख आणि भावनिक संवाद यांच्या माध्यमातून महत्त्वाच्या पदांवर काम करणाऱ्या व्यक्तींना लक्ष्य केले जाते.

भारतासारख्या देशासाठी ही बाब अधिक चिंताजनक आहे. संरक्षण संशोधन आणि विकास संस्था (डीआरडीओ), संरक्षण क्षेत्रातील कंपन्या, लष्करी आस्थापना, सरकारी कार्यालये तसेच महत्त्वाच्या तंत्रज्ञान प्रकल्पांमध्ये काम करणाऱ्या अधिकाऱ्यांकडे देशाच्या सुरक्षेच्या दृष्टीने अत्यंत संवेदनशील माहिती असते. अशा व्यक्तींना हनी ट्रॅपमध्ये अडकवून गोपनीय कागदपत्रे, संरक्षणविषयक संशोधन, क्षेपणास्त्र तंत्रज्ञान, लष्करी हालचाली आणि महत्त्वाच्या प्रकल्पांची माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला जातो. यापूर्वीही भारतात संरक्षण क्षेत्राशी संबंधित काही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना हनी ट्रॅपच्या माध्यमातून लक्ष्य केल्याची प्रकरणे समोर आली आहेत.

आता या हेरगिरीचे स्वरूप केवळ सरकारी किंवा संरक्षण क्षेत्रापुरते मर्यादित राहिलेले नाही. कॉर्पोरेट क्षेत्रातील वरिष्ठ अधिकारी, संशोधक, तंत्रज्ञानतज्ज्ञ आणि महत्त्वाच्या कंपन्यांमध्ये काम करणारे कर्मचारीही हेरगिरीच्या जाळ्यात अडकण्याची शक्यता वाढली आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, सेमीकंडक्टर, क्वांटम कम्प्युटिंग, संरक्षण तंत्रज्ञान आणि डेटा या क्षेत्रांतील संशोधनाला जागतिक स्तरावर मोठे महत्त्व प्राप्त झाले आहे. या संशोधनाशी संबंधित गोपनीय माहिती मिळवण्यासाठी परकीय शक्ती आणि स्पर्धक कंपन्यांकडून वेगवेगळे मार्ग अवलंबले जाऊ शकतात. अशा प्रकारची माहिती चोरीला गेल्यास संबंधित कंपनीचे आर्थिक नुकसान तर होतेच; पण देशाची तांत्रिक आणि सामरिक ताकदही धोक्यात येऊ शकते.



विशेष म्हणजे, हनी ट्रॅपमध्ये अडकवण्यासाठी आता प्रत्यक्ष संपर्काचीही गरज राहिलेली नाही. बनावट सोशल मीडिया खाती, आकर्षक छायाचित्रे, खोटी ओळख आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या साहाय्याने तयार केलेले संदेश किंवा व्हिडिओ यांचा वापर करून विश्वास संपादन केला जाऊ शकतो. सुरुवातीला साधी मैत्री, त्यानंतर वैयक्तिक संवाद आणि पुढे गोपनीय माहिती मिळवण्याचा प्रयत्न, अशा पद्धतीने हे जाळे विणले जाते. त्यामुळे अशा प्रकारच्या सायबर हेरगिरीचा धोका अधिक गंभीर बनला आहे.

या संकटाचा सामना करण्यासाठी केवळ सुरक्षा यंत्रणांवर अवलंबून राहून चालणार नाही. सरकारी आणि खासगी कंपन्यांनी आपल्या कर्मचाऱ्यांसाठी सायबर सुरक्षा आणि माहितीच्या गोपनीयतेबाबत नियमित प्रशिक्षण आयोजित केले पाहिजे. संशयास्पद सोशल मीडिया संपर्क, अनोळखी व्यक्तींकडून होणारी जवळीक आणि गोपनीय माहितीची मागणी याबाबत प्रत्येकाने सतर्क राहणे आवश्यक आहे. तसेच कंपन्यांनी संवेदनशील माहितीपर्यंत पोहोचण्यावर कठोर नियंत्रण ठेवून नियमित सुरक्षा तपासणी केली पाहिजे.

शेवटी, हनी ट्रॅप हा केवळ एखाद्या व्यक्तीच्या वैयक्तिक आयुष्याशी संबंधित प्रश्न नाही, तर तो देशाच्या राष्ट्रीय सुरक्षा, आर्थिक स्थैर्य आणि तंत्रज्ञानविषयक भवितव्याशी निगडित गंभीर प्रश्न आहे. भावनिक कमकुवतपणा, निष्काळजीपणा किंवा आमिषाला बळी पडण्याची वृत्ती यामुळे देशाची मौल्यवान माहिती शत्रूच्या हाती जाण्याचा धोका आहे. त्यामुळे डिजिटल युगात तंत्रज्ञानाइतकीच सावधगिरीही महत्त्वाची आहे. कारण आजच्या काळात देशाच्या सीमांचे रक्षण करण्याबरोबरच देशाची माहिती, संशोधन आणि तंत्रज्ञान सुरक्षित ठेवणेही तितकेच आवश्यक आहे. हेरगिरीच्या या अदृश्य जाळ्याला वेळीच रोखणे ही काळाची गरज आहे!

- श्याम ठाणेदार
दौंड जिल्हा पुणे

स्वत:च स्वत:ची पहाट हो

नसेल कुणी सोबती,
तरी चालत राहायचे,
स्वत:च्या पावलांनीच
आभाळ गाठायचे.

कशास मागणे प्रकाश,
दुसऱ्यांच्या हातातून?
एक सूर्य पेटवायचा,
आपल्या अंतरातून.

जखमा असतील मनात,
तरी हसत राहायचे,
पडलेल्या स्वप्नांना
पुन्हा उभे करायचे.

नको जगाची दाद,
नको कौतुकाची फुले,
स्वत:च्या कर्तृत्वाने
जीवन उजळून निघे.

एकांत म्हणजे अंत नव्हे,
ती नवी सुरुवात आहे,
स्वत:ला जिंकण्याची
ती सुवर्णसंधी आहे.

जगण्याच्या रणांगणी,
नको कुणाचा आधार,
स्वत:च व्हावे बळ,
स्वत:च व्हावे तलवार.

स्वत:वर प्रेम कर,
स्वत:साठी जगत राहा,
आनंदाची चावी
स्वत:च्याच हाती ठेवून जा.

नको शोधूस सुख
दुसऱ्यांच्या सहवासात,
स्वर्ग फुलवता येतो
स्वत:च्याच मनोविश्वात.

कारण माणूस हरत नाही
एकटा राहिल्याने,
तो हरतो स्वत:वरील
विश्वास गमावल्याने.

स्वत:च स्वत:चा दीप हो,
स्वत:च स्वत:ची वाट हो,
जगण्याच्या या प्रवासात
स्वत:च स्वत:ची पहाट हो.

– कीर्तिराज आगलावे,
पुणे

अक्षराज अचूक वेध, अचूक बातमी

ज्वारीच्या पिठाचे खमंग कुरकुरीत बन्स



ही तशी एक पारंपारीक डिशच आहे. पण ज्वारीच्या पिठात डाळीचे पीठ,गव्हाचे पीठ घालून घट्ट भिजवून भरपूर कांदा, तिखट,मिठ घालून खमंग थालीपीठे नेहमी बनवली जायची.

आता यातच काळानुरूप झटपट बनण्यासाठी, थापत बसण्यापेक्षा सोप्या पद्धतीने बन्स बनवूया. बेसन आणि कणिक घातल्यामुळे पिठाला चिकटपणा, घट्टपणा येतो, तो टाळण्यासाठी त्याऐवजी आपण रवा घातला तर अधिक कुरकुरीत, फुगलेले, हलके असे बन्स बनतात. पाहूया मग लगेंच...

▸ साहित्य :

१ वाटी मध्यम चौकोनी कट केलेला कांदा, १ वाटी ज्वारीचे पीठ, पाव वाटी बारीक रवा, १ चमचा लाल तिखट, २ चमचे तीळ, १ वाटी बारीक चिरलेली कोथिंबीर, रंगासाठी किंचित हळद, चवीनुसार मीठ, चिमूटभर सोडा, तेल.

▸ कृती :

प्रथम एका मोठ्या बाऊलमध्ये कांदा, कोथिंबीर, तीळ, तिखट घालून त्यात ज्वारीचे पीठ, रवा घालून चवीनुसार मीठ घालावे व मस्त मिक्स करून पाणी घालून छान सैलसर भज्याच्या पिठाप्रमाणे सरसरीत भिजवून दहा मिनिटे झाकून ठेवावे. वेळ कमी असेल तर भिजवून लगेंच बनवले तरी चालते,पण मुरले की रवा छान फुगतो, सारे स्वाद मस्त मुरतात त्यामुळे अधिक मस्त टेस्ट येते.

आता गॅसवर छोटे पसरट कडा असलेला छोटा तवा किंवा पसरट कढई ठेवावी. तोवर बॅटर मस्त एकाच दिशेने गोलाकार फेटावे. आता त्यात सोडा घालून पुन्हा भरपूर फेटावे. म्हणजे ते छान फुगतात आणि हलके होतात.

आता तवा छान गरम झाला असेल. त्यात ब्रश ने तेल लावावे व त्यावर हे डावभर बॅटर पसरावे. व डावाने एकसारखे पातळसर पसरून त्यावर झाकण ठेवावे.

मध्यम आचेवर छान खरपूस भाजले की उलथण्याने उलटून वरची बाजूही खाली करून दोन्ही बाजू व्यवस्थित भाजावी. आता सर्व्हिंग डिश मध्ये काढून हे बन्स दही, टोमॅटो केचप ,लोणच्याच्या सोबत गरम गरम सर्व्ह करावे.

▸ वैशिष्ट्य :

हे बन्स दिसायलाच लाल तिखटामुळे लाल, हिरव्या कोथिंबीर आणि तीळ घातल्यामुळे इतके मोहक दिसतात की पाहून आणि स्वादामुळेच भूक खवळते.

तीळामुळे वेगळाच खुसखुशीतपणा, टेस्ट येते. यात आपल्या आवडीनुसार कोबी, इतर काही फळभाज्या, पालेभाज्या किंवा कांद्याची पात सुद्धा घालू शकतो. म्हणजे दरवेळी वेगवेगळी टेस्ट मिळेल. आणि ज्वारीच्या पिठामुळे शुगर पेशंट साठीही उत्तम आहेच. कमीतकमी तेलावर हे बनतात त्यामुळे खूपच पौष्टिक, हेल्दी असतात. झटपट बनतात. पोटभरीचे असल्यामुळे सकाळी नाश्त्याला, मधल्यावेळेस, किंवा अगदी रात्रीच्या जेवणासाठी बनवले तरीही चालतात. यातील भाज्यांच्यामुळे चव तर बेस्ट लागतेच पण पौष्टिकताही वाढते. हे मुळात खमंगच असल्याने सोबत जास्त काही बनवावेही लागत नाही. अगदी दही,लोणचे, सॉस, शेंगादाण्याच्या चटणी सोबत खाल्ले तरी चालते.

- सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.

'एनडीए' मध्ये विविध पक्षांच्या पाठींब्यामुळे उत्साहाचे वातावरण

मतदार संघ पुनर्रचना विधेयक व महिला आरक्षण या विधेयकाच्या बाजूने अनेक घडामोडी घडत आहेत व एनडीए ला अधिक पाठींबा मिळू लागला आहे. मागील लोकसभेच्या अधिवेशनात हे बिल पुरेशा संख्येअभावी, मंजूर होऊ शकले नव्हते पण आता ही विधेयके दोन तृतीयांश बहुमताने जिंकण्याचा एनडीए चा इरादा दिसतो.

नुकताच राष्ट्रवादी शरद पवार गटाने या विद्येयकांच्या बाजूने आपले मत व्यक्त केले आहे. या पक्षाचे आठ सदस्य आहेत. यांचा पाठींबा मिळाल्यास लोकसभेत ही संख्या ३२७ वर पोहचेल. या पूर्वी तृणमूल कॉग्रेस मधून फुटून निघालेले २० खासदारांनी एनडीए ला पाठींबा दिलेला आहे. पंजाब मधील अकाली दल सुद्धा पाठींबा देण्याच्या तयारीत आहे. एकूण विचार करता आवश्यक असलेल्या दोन तृतीयांश संख्येपेक्षा सुमारे १० ते १५ अधिक मते मिळण्याची शक्यता आहे.

या पूर्वी १७ एप्रिल रोजी ही दोन्ही विधेयके लोकसभेत दोन तृतीयांश मताने विजयी होऊ शकली नव्हती. त्यावेळी एन डी ए च्या बाजूने २९८ व आघाडीच्या बाजूने २३० मते मिळाली होती. आता परिस्थिती पालटली आहे. सध्या तृणमूल काँग्रेसचे उर्वरित ८ सदस्य पक्षाची साथ सोडू शकतात. शिवाय सपाच्या ३७ खासदाराबाबत सुद्धा अशीच स्थिती होऊ शकते. तामीळ नाडू मध्ये द्रमुकचे २२ खासदार एन डी ए कडे पाठींबा देऊ शकतात. किंवा तटस्थ शकतात. लोकसभेत सध्या १६ अपक्ष खासदार आहेत ते तटस्थ किंवा अनुपस्थित राहू शकतात दक्षिणेकडील राज्यांचा या विधेयकाविरुद्ध चिंतेचा सूर आहे.

त्यासाठी केंद्र सर्व राज्यामध्ये जागा ५० टक्क्यांनी वाढविण्याच्या प्रस्तावावर विचार करत आहे एकूणच ही दोन्ही विधेयके दोन तुतीयांश मतांनी विजयी करण्याचा इरादा एनडीए चा आहे. सध्या गृहमंत्री अमित शाह हे विविध राजकीय पक्षांशी या बाबत चर्चा करत आहेत अशी वार्ता आहे.

- शांताराम वाघ, पुणे

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

थोडक्यात बातम्या

हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसेनेतर्फे कला दालनात अभिवादन!

अक्षराज : घनश्याम आंबोकर



दि.१७, मिरा-भाईंदर : हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख स्वर्गीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त १७ नोव्हेंबर २०२६ रोजी मिरा-भाईंदर शिवसेनेच्या वतीने हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे कला दालनात अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी शालेय विद्यार्थी, विद्यार्थिनी आणि ज्येष्ठ नागरिकांना बाळासाहेबांच्या कार्याची माहिती देऊन त्यांच्या स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी चंद्रकांत मुद्रस यांनी बाळासाहेबांच्या कार्याचा आणि त्यांच्या आठवणींचा उजाळा देत उपस्थितांना मार्गदर्शन केले.

महिला संघटक निशा नार्वेकर यांनीही बाळासाहेबांना अभिवादन करताना सांगितले की, आपण दादर येथे राहत असताना शिवाजी पार्कवर होणाऱ्या दसरा मेळाव्याला तसेच बाळासाहेबांची अन्य भाषणे ऐकण्यासाठी आवर्जून जात असत. त्यांच्या भाषणातून आणि मार्गदर्शनातून नेहमीच प्रेरणा मिळत असे. बाळासाहेबांच्या नावाने उभारण्यात आलेले महाराष्ट्रातील हे एकमेव कला दालन असून, या माध्यमातून मुलांना मनोरंजनासोबतच ज्ञान मिळण्याची उत्तम संधी उपलब्ध होणार आहे.

शिवसेना नेते संतोष गोळे यांनी बाळासाहेबांच्या नेतृत्वाचा, कट्टर हिंदुत्ववादी विचारांचा आणि त्यांच्या प्रभावी व्यक्तिमत्त्वाचा गौरव केला. मुंबईतील बॉम्बस्फोटांच्या काळात भयभीत झालेल्या व्यापारी वर्गाला बाळासाहेबांनी धीर देत निर्भयपणे उभे राहण्याचे बळ दिले, असे त्यांनी नमूद केले.

शिवसेना नेते निखिल तावडे यांनी आपल्या खास शैलीत बाळासाहेबांना अभिवादन केले. तसेच आमदार प्रताप सरनाईक यांच्या संकल्पनेतून साकारलेले हे कला दालन मिरा-भाईंदरकरांसाठी एक उत्कृष्ट वास्तू असल्याचे सांगितले.

शिवसेना जिल्हाप्रमुख राजू भोईर यांनी बाळासाहेबांना आदरांजली अर्पण करताना कला दालन अद्याप सर्वसामान्य नागरिकांसाठी खुले न झाल्याबद्दल तीव्र नाराजी व्यक्त केली. हे कला दालन लवकरात लवकर नागरिकांसाठी खुले करावे, अन्यथा शिवसैनिक आपल्या पद्धतीने आंदोलन करतील, असा इशाराही त्यांनी दिला. महानगरपालिकेकडे कला दालनाच्या देखभालीसाठी निधी उपलब्ध नसेल, तर शिवसेना आणि शिवसैनिक देखभालीची जबाबदारी घेण्यास तयार आहेत, असे त्यांनी स्पष्ट केले. आमदार प्रताप सरनाईक यांनी कला दालनाच्या देखभालीसाठी दरमहा १० लाख रुपये देण्याची तयारी दर्शवली असून, महापौरांनीही त्यासंदर्भात अधिकृत पत्र द्यावे, अशी मागणी त्यांनी केली.

कार्यक्रमाचे प्रभावी सूत्रसंचालन दीप काकडे यांनी केले. त्यांच्या दमदार भाषणशैलीमुळे उपस्थित विद्यार्थी विशेष आनंदित झाले. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थित पत्रकार, नागरिक आणि मान्यवरांचे आभार मानण्यात आले.

यावेळी विद्यार्थ्यांनी कला दालनातील विज्ञान आणि मनोरंजनविषयक माहितीचा आनंद घेत हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांना विनम्र अभिवादन केले.

बाळासाहेबांचे विचार, नेतृत्व आणि कार्य पुढील पिढीपर्यंत पोहोचवण्याचा संकल्प या कार्यक्रमातून व्यक्त करण्यात आला.

अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या ०३ नायजेरियन नागरिकांना अटक

११ कोटी रु. किंमतीचा कोकेन व एम.डी.असा अंमली पदार्थ जप्त

अक्षराज : विनोद वास्कर

दि.१७, मुंब्रा, : मुंब्रा पोलीस स्टेशन, ठाणे शहरच्या हद्दीत मुंब्रा व दिवा परिसरात अंमली पदार्थांची विक्री व सेवन करणाऱ्या तसेच अवैध वास्तव्य करणाऱ्या व अंमली पदार्थ विक्री करणाऱ्या इसमांविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत मा. पो. आयुक्त सो, मा. पो. उप आयुक्त सो, यांनी आदेश दिले होते. त्याप्रमाणे वपोनि / गणेश जवादवाड सो, यांनी मुंब्रा, दिवा बेतवडे भागातील मॅरेथॉन प्रोजेक्ट मधील बिल्डींगमध्ये सर्च ऑपरेशन करण्यास सांगितले होते.

त्याअनुषंगाने मुंब्रा पोलीस स्टेशन, एन.डी.पी.एस. पथकास मॅरेथॉन नेक्सवर्ल्ड, बेतवडे गांव, दिवा याठिकाणी काही नायजेरियन नागरिक राहत असून ते अंमली पदार्थांची विक्री करीत असल्याची गुप्त माहिती मिळाल्याने मा. वरिष्ठांच्या आदेशाने नमुद ठिकाणी मुंब्रा पोलीस स्टेशन एन.डी.पी.एस. पथकाने अधिक माहिती घेऊन मॅरेथॉन नेक्सवर्ल्ड सोसायटीमध्ये सर्च ऑपरेशन राबविले.

६०० फ्लॅट्समध्ये सर्च ऑपरेशन

सदर सर्च ऑपरेशन दरम्यान नमुद सोसायटीचे इमारतीमधील एकूण ६०० फ्लॅट्स सर्च करीत असताना पथकाने योग्य नियोजनबध्द प्लॅनींग करून सदर सोसायटीचे ऑरा इमारतीमध्ये राहत असलेले परदेशी नायजेरियन नागरिक यांना ताब्यात घेतले.

अटक आरोपी - १ आणि २

१) चुकवुएमेका इमॅन्युएल न्वांको, वय ४९ वर्षे, (MR. EMMANUEL CHUKWUEMEKA NWANKWO) (मूळ राह. नायजेरिया देश)

२) युकेरिया चुकवुएमेका ओबियानुजु, वय ४९ वर्षे, (MRS. EUCHARIA CHUKWUEMEKA OBIANUJU) (मूळ राह. नायजेरिया देश)



यांचे राहते त्यांचे कब्ज्यात मानवी आरोग्यावर विपरीत परिणाम करणारा एकूण ०२ किलो ९८.४ ग्रॅम वजनाचा कोकेन व एकूण १०४.७ ग्रॅम मेफ ड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ विक्रीकरिता बेकायदेशिररित्या स्वतःचे राहते घरी कब्जात बाळगला असताना मिळून आल्याने त्यांचे विरोधात दि. १४/११/२०२६ रोजी गु.र.क्र. खख २०५३/२०२६, एन.डी.पी.एस. ॲक्ट कलम ८(क), २२(क), २९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात येऊन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

तिसरा आरोपी - साथीदार

नमुद गुन्ह्याच्या तपासादरम्यान अटक आरोपी याने सदरचा अंमली पदार्थ त्याचा साथीदार नामे उस्मान बुआरी अली (OSMAN BUARI ALI) मुळ रा. सेनेगल, पूर्व आफ्रिका याचेसोबत मिळून खरेदी-विक्री करीत असल्याची माहिती दिल्याने त्याअनुषंगाने लागलीच तपासाची चक्रे फिरवून नमुद इसमाचा शोध घेऊन त्यास नमुद गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. नमुद आरोपीच्या अंगझडती दरम्यान आरोपीच्या ताब्यातून ५९ ग्रॅम वजनाचा कोकेन हा अंमली पदार्थ जप्त करण्यात आला आहे.

एकूण जप्त मुद्देमाल आणि रिमांड

नमुद गुन्ह्यातील तीनही अटक आरोपी यांचे कब्जातून अद्यापावेतो ०२ किलो १५७.५ ग्रॅम वजनाचा कोकेन व १०४.७ ग्रॅम वजनाचा मेफेड्रॉन (एम.डी.) हा अंमली पदार्थ तसेच इतर वस्तु असा एकूण रु. १०,९३,०८,७००/- (दहा कोटी तेरानव लाख आठ हजार सातशे रुपये किंमतीचा) मुद्देमाल नमुद गुन्ह्यात जप्त करण्यात आलेला असून तीनही अटक आरोपींना मा. न्यायालयाने दि. १८/११/२०२६ पावेतो पोलीस कोठडी रिमांड दिले आहे.

भाजपातील गटबाजीला कंटाळून शिवाजीराव दिवटे यांचा शिवसेना (उबाठा) मध्ये प्रवेश

२५ वर्षांच्या भाजपातील प्रवासाला पूर्णविराम; आ.राहुल पाटील यांच्या उपस्थितीत पक्षप्रवेश

अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.१७, पालम (परभणी) : भारतीय जनता पार्टीमध्ये तब्बल पंचवीस वर्षे निष्ठेने आणि प्रामाणिकपणे काम करणारे भाजपाचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य शिवाजीराव दिवटे यांनी अखेर पक्षाला सोडचिठ्ठी देत शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षात जाहीर प्रवेश केला. परभणीचे शिवसेना (उबाठा) आमदार राहुल पाटील आणि पक्षाचे प्रभारी प्रदीपकुमार खोपडे यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पक्षप्रवेश सोहळा पार पडला. यावेळी शिवसेनेच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी दिवटे यांचे स्वागत केले.

२५ वर्षांच्या निष्ठावान राजकीय प्रवासाला पूर्णविराम

शिवाजीराव दिवटे यांनी आपल्या राजकीय कारकिर्दीची सुरुवात भाजपाच्या सामान्य कार्यकर्त्यापासून केली होती. गावपातळीपासून तालुकास्तरापर्यंत पक्ष संघटन मजबूत करण्यासाठी त्यांनी सातत्याने प्रयत्न केले. गोरगरीब, शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांचे प्रश्न सोडविण्यासाठी त्यांनी सक्रिय भूमिका बजावली. त्यांच्या कामाची दखल घेत पक्षाने त्यांच्यावर पालम तालुकाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली. त्यानंतर प्रदेश कार्यकारिणी सदस्य म्हणूनही त्यांनी काम पाहिले.

गटबाजी आणि डावलण्याच्या भूमिकेमुळे नाराजी

मात्र, गेल्या काही वर्षांपासून गंगाखेड विधानसभा मतदारसंघातील भाजपामध्ये गटबाजी वाढल्याचा आरोप शिवाजीराव दिवटे यांनी केला. पक्षातील काही आजी-माजी पदाधिकाऱ्यांकडून आपल्याला जाणीवपूर्वक डावलले जात होते. विविध कार्यक्रम आणि पक्षाच्या उपक्रमांपासून दूर ठेवून पक्षात आपली कोंडी करण्याचा प्रयत्न झाल्याची नाराजी त्यांनी व्यक्त केली.

या संदर्भात वरिष्ठ नेत्यांकडे वेळोवेळी तोंडी तसेच लेखी तक्रारी करूनही त्याची दखल घेतली गेली नाही, असेही त्यांनी सांगितले. तब्बल पंचवीस वर्षे पक्षासाठी प्रामाणिकपणे काम करूनही निष्ठावान कार्यकर्त्याला न्याय मिळत नसेल, तर पक्षात राहण्याचा उपयोग काय? असा सवाल उपस्थित करत स्वाभिमानासाठी आपण भाजपाला सोडचिठ्ठी दिल्याचे दिवटे यांनी पक्षप्रवेशावेळी स्पष्ट केले.



शिवसेना संघटन मजबूत करण्याचा निर्धार...

शिवसेना (उबाठा) पक्षात प्रवेश केल्यानंतर शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या विचारांवर विश्वास ठेवून आमदार राहुल पाटील यांच्या नेतृत्वाखाली पालम तालुक्यात पक्ष संघटन अधिक मजबूत करण्यासाठी काम करणार असल्याचा निर्धार दिवटे यांनी व्यक्त केला. गोरगरीब जनता, शेतकरी, शेतमजूर तसेच युवकांच्या रोजगारासह सर्वसामान्यांचे प्रश्न सोडविण्यासाठी शिवसेनेच्या माध्यमातून संघर्ष करणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

शिवाजीराव दिवटे यांच्या या पक्षप्रवेशामुळे पालम तालुक्यातील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विशेषतः भाजपासाठी हा धक्का मानला जात असून, शिवसेना (उबाठा) पक्षाला पालम तालुक्यात नवे संघटनात्मक बळ मिळाल्याची चर्चा राजकीय वर्तुळात सुरू आहे.

प्रशिक्षकाची साथ नसतानाही उरणच्या जलकन्येची जागतिक झेप!

अक्षराज : अभिनव येलवे



दि.१८, उरण : वय अवघे १४ वर्षे, विंडसर्फिंगचा अनुभव जेमतेम दोन वर्षांचा आणि सोबतीला कोणताही वैयक्तिक प्रशिक्षक नाही, अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करत उरणच्या जलकन्या प्रियांशी पाटील हिने डकार २०२६ युथ ऑलिम्पिक गेम्समध्ये भारताचा झेंडा जागतिक स्तरावर उंचावला आहे. पदकाने हुलकावणी दिली असली, तरी जागतिक स्तरावर सहावे स्थान पटकावत तिने आपल्या जिद्दीची आणि क्रीडाकौशल्याची प्रभावी छाप उमटवली आहे. विशेष म्हणजे, स्पर्धेच्या पहिल्याच दिवशी तिसरे स्थान मिळवत तिने पदकाच्या आशा निर्माण केल्या होत्या.

जागतिक स्तरावरील या स्पर्धेत सहभागी झालेल्या अनेक देशांच्या खेळाडूंसोबत अनुभवी प्रशिक्षकांची टीम होती. मात्र, प्रियांशीला वैयक्तिक प्रशिक्षकाचे मार्गदर्शन उपलब्ध नव्हते. विंडसर्फिंगसारख्या तांत्रिक कौशल्य आणि हवामानातील बदलांवर अवलंबून असलेल्या खेळात प्रशिक्षकाची भूमिका अत्यंत महत्त्वाची असते. वाऱ्याचा वेग, समुद्रातील लाटा आणि बदलत्या परिस्थितीनुसार रणनीती आखताना प्रशिक्षकाची साथ नसल्याने तिला काही अडचणींचा सामना करावा लागला. परिणामी, सुरुवातीच्या तिसऱ्या स्थानावरून तिची क्रमवारी घसरली. मात्र, या परिस्थितीने खचून न जाता स्वतःच्या कौशल्यावर आणि आत्मविश्वासावर विश्वास ठेवत तिने स्पर्धेच्या अखेरपर्यंत पहिल्या दहामध्ये स्थान कायम राखले आणि सहावा क्रमांक मिळवला.

या स्पर्धेत इटलीच्या लॉरा ग्रासो कास्टाग्नेटा हिने सुवर्णपदक, स्पेनच्या ओलिविया सांचेज हिने रौप्यपदक, तर चीनच्या वू झियान हिने कांस्यपदक पटकावले.

प्रियांशीचा विंडसर्फिंगमधील प्रवासही तितकाच प्रेरणादायी आहे. डिसेंबर २०२४ मध्ये तिने या खेळाचे प्राथमिक प्रशिक्षण घेण्यास सुरुवात केली. सुरुवातीला समुद्राचे पाणी आणि खडक यांची भीती वाटत असतानाही भावाच्या प्रोत्साहनामुळे तिने समुद्रात पाऊल ठेवले. हळूहळू विंडसर्फिंगची आवड निर्माण झाली आणि याच खेळाला तिने आपल्या स्वप्नांचा मार्ग बनवले. अवघ्या दोन वर्षांच्या सरावात जागतिक स्पर्धेपर्यंत मजल मारणे ही तिच्या मेहनतीची साक्ष आहे.

या संपूर्ण प्रवासात प्रियांशीच्या वडिलांची भूमिका महत्त्वपूर्ण राहिली आहे. भारतीय नौदलात कार्यरत असलेले तिचे वडील स्वतः लांब पल्ल्याचे जलतरणपटू आहेत. त्यामुळे त्यांना जलक्रीडेचे महत्त्व आणि आव्हाने यांची चांगली जाण आहे. त्यांनी प्रियांशीला सातत्याने प्रोत्साहन दिले. वैयक्तिक प्रशिक्षकाची साथ नसतानाही वडिलांनी दिलेला 'हार मानायची नाही' हा मंत्र तिने प्रत्यक्ष मैदानात उतरून सिद्ध केला.

> आपल्या खेळाविषयी भावना व्यक्त करताना प्रियांशी म्हणाली, मला विंडसर्फिंगचे अक्षरशः वेड आहे. ऑलिम्पिक गोल्ड आणि विंडसर्फिंग यापैकी एकाची निवड करायची झाली, तरी मी विंडसर्फिंगचीच निवड करेन. कारण या खेळातून मला मनःशांती मिळते.

५५ ते ६० लाख रुपये जमा; तरी प्रशिक्षणार्थी शिक्षकांना पिण्याचे पाणीही मिळेना

चहा-नाश्ता नको, किमान पाणी तरी द्या- प्रा. सत्येंद्र पाटील यांचा संतप्त सवाल

अक्षराज : शिवाजी औसेकर

दि.१७, बीड : शिक्षकांच्या ज्ञानवृद्धीसह अध्यापन कौशल्यात भर घालून त्याचा थेट फायदा विद्यार्थ्यांना व्हावा, या उद्देशाने जिल्हाभरात वरिष्ठ व निवड श्रेणीचे प्रशिक्षण सुरू आहे. मात्र, या प्रशिक्षणादरम्यान प्रशिक्षणार्थी शिक्षकांना साधे स्वच्छ पिण्याचे पाणीही उपलब्ध होत नसल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. यावरून शिक्षक संघटनांनी तीव्र नाराजी व्यक्त केली असून, प्रशिक्षण केंद्रावर प्रशिक्षणार्थी शिक्षकांच्या पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करता येत नसेल, तर जमा झालेल्या ५५ ते ६० लाख रुपयांचे काय करता? असा संतप्त सवाल प्रा. सत्येंद्र पाटील यांनी उपस्थित केला आहे.

दि. १२ ते २२ नोव्हेंबर या कालावधीत बीड, अंबाजोगाई, आष्टी, गेवराई यांसह जिल्ह्यातील विविध ठिकाणी सकाळी ९ ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत हे प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. विशेष म्हणजे, दिवाळीच्या सुट्ट्यांचा त्याग करून शिक्षक या प्रशिक्षणात उत्साहाने सहभागी होत आहेत. या प्रशिक्षणाचा अंतिम लाभ विद्यार्थ्यांना होणार असल्याने शिक्षकही सकारात्मक दृष्टिकोनातून प्रशिक्षण घेत आहेत. मात्र, जुक्ता संघटनेच्या वतीने जिल्ह्यातील विविध प्रशिक्षण केंद्रांना भेटी दिल्यानंतर अनेक गंभीर बाबी समोर आल्या. बहुतांश प्रशिक्षण केंद्रांवर पिण्याच्या स्वच्छ पाण्याची कोणतीही व्यवस्था नसल्याच्या तक्रारी प्रशिक्षणार्थी शिक्षकांनी केल्या. सध्या उन्हाळ्यासारखी उष्णता जाणवत असताना दिवसभर प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांना पिण्याच्या पाण्यासाठी गैरसोय सहन करावी लागत आहे.



ही बाब अत्यंत दुर्दैवी आणि निषेधार्ह असल्याचे प्रा. पाटील यांनी म्हटले आहे. बीड जिल्ह्यातील विविध प्रशिक्षण केंद्रांवर अंदाजे २ हजार ७०० ते ३ हजार शिक्षक प्रशिक्षण घेत असून, प्रत्येक प्रशिक्षणार्थीकडून २ हजार रुपये शुल्क आकारण्यात आले आहे. त्यामुळे एकूण जमा होणारी रक्कम जवळपास ५५ ते ६० लाख रुपयांच्या घरात जाते. एवढी मोठी रक्कम जमा होत असताना प्रशिक्षणार्थी शिक्षकांसाठी किमान पिण्याच्या स्वच्छ पाण्याची व्यवस्था का केली जात नाही, असा सवालही त्यांनी उपस्थित केला. आम्ही जमा झालेल्या पैशांचा हिशेब किंवा ऑडिट मागत नाही. चहा-नाश्त्याचीही अपेक्षा नाही. आमची माफक अपेक्षा एवढीच आहे की, दिवसभर प्रशिक्षण घेणाऱ्या शिक्षकांना किमान स्वच्छ पिण्याचे पाणी तरी उपलब्ध करून द्यावे. शिक्षकांच्या मूलभूत गरजांकडेही दुर्लक्ष होत असेल, तर ही बाब खेदजनक आहे, असे प्रा. सत्येंद्र पाटील यांनी स्पष्ट केले.

शिक्षकांच्या प्रशिक्षणासाठी लाखोंचे शुल्क आकारायचे आणि त्याच शिक्षकांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण करायला लावायचे, हा कोणता न्याय? असा प्रश्न उपस्थित करत जुक्ता संघटनेच्या वतीने या कारभाराचा तीव्र शब्दांत जाहीर निषेध करण्यात आला आहे. संबंधित यंत्रणेने तातडीने सर्व प्रशिक्षण केंद्रांवर स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करावी, अशी ठाम मागणीही करण्यात आली आहे.

रात्रीच्या अंधारात दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांना एसटी बसमधून उतरवले

भंडारा ते मुंधारी जाणाऱ्या बसमधील घटना: परिवहन मंत्री सरनाईक यांच्या आदेशानुसार चालक, वाहक निलंबित

अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.१७, मिरा भाईंदर : भंडारा जिल्ह्यात महाराष्ट्र राज्य रस्ते वाहतूक महामंडळाच्या (एसटी) बसमधून प्रवास करणाऱ्या दोन अल्पवयीन विद्यार्थ्यांना त्यांच्या नियोजित स्थळी नेण्याऐवजी रात्रीच्या अंधारात रस्त्यावर उतरवल्याची एक गंभीर घटना उघडकीस आली आहे. भंडारा एसटी डेपो ते मुंधारी गावाकडे जाणाऱ्या बसम ध्ये घडलेल्या या घटनेमुळे, विशेषतः विद्यार्थी आणि महिला प्रवाशांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत. या घटनेची गंभीर दखल घेत, राज्याचे परिवहन मंत्री आणि एसटी महामंडळाचे अध्यक्ष प्रताप सरनाईक यांनी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आहेत. चौकशीअंती, संबंधित बसचे चालक अनिल सावरे आणि वाहक उदेभान मेशाम यांना १६ नोव्हेंबरपासून निलंबित करण्यात आले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, १४ नोव्हेंबर २०२६ रोजी, भंडारा एसटी डेपोची बस क्रमांक चक-४० ध-५००८ भंडारा येथून मुंधारी गावाकडे निघाली. या बसमधून मुंधारी गावातील दोन विद्यार्थिनी प्रवास करत होत्या. रात्री जेव्हा बस रोहा गावाजवळ पोहोचली, तेव्हा पुढे जाण्यासाठी बसमध्ये दुसरे प्रवासी नव्हते. हे कारण सांगून, चालक आणि वाहकाने त्या दोन्ही विद्यार्थिनींना त्यांच्या अंतिम मुक्कामाच्या ठिकाणी, म्हणजेच मुंधारी गावाला नेण्याऐवजी, रात्रीच्या अंधारात रोहा गावात उतरवले. त्यानंतर, बसने यू-टर्न घेतला आणि परतीचा प्रवास सुरू केला.

ही घटना समजताच, जिल्हा परिषदेच्या शिक्षण आणि बांधकाम समितीचे अध्यक्ष नरेश ईश्वरकर यांनी आपला पूर्वनियोजित दौरा रद्द केला आणि तात्काळ रोहा गावात पोहोचले. त्यांनी या प्रकरणी चालक आणि वाहकाला जबाबदार धरले आणि उत्तरांची मागणी केली. त्यांनी एसटी कॉर्पोरेशनच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांशी संपर्क साधला आणि दोन्ही कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली. स्थानिक वृत्तानुसार, पालक आणि नरेश ईश्वरकर वेळेवर घटनास्थळी पोहोचले आणि विद्यार्थ्यांना मदत मिळाली.

दोन कर्मचाऱ्यांवर तात्काळ कारवाई

या घटनेचे वृत्त प्रसारमाध्यमे आणि सोशल मीडियावर प्रसिद्ध झाल्यानंतर, परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी याची गंभीर दखल घेतली. त्यांनी एसटी प्रशासनाला तात्काळ चौकशी करून जबाबदार कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याचे आदेश दिले.

भंडारा विभागीय नियंत्रक आणि डेपो व्यवस्थापकांनी केलेल्या प्राथमिक चौकशीत चालक अनिल सावरे आणि वाहक उदेभान मेशाम यांचा निष्काळजीपणा उघड झाला. परिणामी, दोघांनाही १६ नोव्हेंबरपासून तात्काळ प्रभावाने निलंबित करण्यात आले आहे. कॉर्पोरेशनच्या शिस्तपालन आणि अपील नियमांनुसार त्यांच्यावर पुढील विभागीय कारवाईही सुरू करण्यात आली आहे.

अशी घटना पुन्हा घडल्यास सेवेतून बडतर्फ करण्याचा इशारा


प्रताप सरनाईक यांनी स्पष्ट केले की प्रवाशांची सुरक्षा हे एसटी कॉर्पोरेशनचे सर्वोच्च प्राधान्य आहे. विशेषतः, महिला, मुले, शालेय विद्यार्थी आणि ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेबाबत कोणताही निष्काळजीपणा खपवून घेतला जाणार नाही.

बसमध्ये प्रवास करणाऱ्या मुलांना स्वतःच्या मुलांप्रमाणे वागवून त्यांना त्यांच्या ठरलेल्या ठिकाणी सुरक्षितपणे पोहोचवण्याची जबाबदारी घेण्याचे निर्देश त्यांनी एसटी कर्मचाऱ्यांना दिले आहेत. अशा घटनांची पुनरावृत्ती टाळण्यासाठी एसटी प्रशासनाला तातडीने आवश्यक मार्गदर्शक तत्त्वे आणि परिपत्रके जारी करण्याचे निर्देशही देण्यात आले आहेत.

भविष्यात असा निष्काळजीपणा पुन्हा आढळल्यास, जबाबदार कर्मचाऱ्यांवर निलंबन आणि बडतर्फीसह कठोर कारवाई केली जाईल, असा इशारा मंत्री सरनाईक यांनी दिला आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेतील प्रवाशांच्या सुरक्षेची जबाबदारी घेणे हे एसटी कर्मचाऱ्यांचे कर्तव्य आहे. अल्पवयीन विद्यार्थिनींना, विशेषतः रात्रीच्या वेळी, त्यांच्या ठरलेल्या ठिकाणी सुरक्षितपणे पोहोचवण्याच्या जबाबदारीतून कोणताही कर्मचारी सुटू शकत नाही. ही घटना एसटी व्यवस्थेसाठी एक गंभीर इशारा ठरली आहे.

थोडक्यात बातम्या

वर्तमानातील ग्रामविनाश आणि महात्मा गांधीची भूमिका विषयावर व्यख्यान आयोजित



अक्षराज : घनश्याम आंबोकर

दि.१७, मिरा भाईंदर : मूलभूत अधिकार संघर्ष समिती (मास) यांच्यावतीने दिनांक २१ नोव्हेंबर २०२६ रोजी 'वर्तमानातील ग्रामविनाश आणि महात्मा गांधींची भूमिका' या विषयावर व्याख्यान जनता केंद्र, ताडदेव, मुंबई सेंट्रल स्थानकाच्या पश्चिमेला (स्टेशन पासून जवळ अंतरावर सभागृह आहे) आयोजित करण्यात आले आहे. सर्व सुजाण नागरिकांना विनंती आहे, आपण व्याख्यान ऐकण्यास यावे. व सदपरिस्थिती बद्दल माहिती घ्या असे अहवान जनता केंद्राचे अध्यक्ष दिनेश राणे नी केले आहे. जनता केंद्र नेहमीच अन्याय विरुद्ध आंदोलनाचा केंद्र राहिला आहे.

MSME उद्योजकांसाठी सेंट्रल बँकेचा विशेष कर्ज मेळावा



अक्षराज : राजकुमार इकडे

दि.१७, सुपा (अहिल्यानगर) : लघु, सूक्ष्म आणि मध्यम उद्योगांना आर्थिक बळ देऊन व्यवसाय वाढीला चालना देण्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या वतीने २० नोव्हेंबर २०२६ रोजी विशेष MSME क्रेडिट आऊटरीच कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या मेळाव्यात उद्योजकांना आकर्षक व्याजदर, कमी प्रक्रिया शुल्क, जलद कर्जमंजुरी आणि सुलभ कर्जप्रक्रियेची माहिती मिळणार आहे. तसेच मॉर्गेज बिझनेस लोन, कॉन्ट्रॅक्टर लोन, इंजिनिअरिंग लोन, हॉटेल लोन, ऊर्जा कार्यक्षमता कर्ज, वाहन व्यवसाय कर्ज, GST कर्ज अशा विविध योजनांची माहिती दिली जाणार आहे. व्यवसायाचा विस्तार करू इच्छिणारे उद्योजक, व्यावसायिक आणि नवउद्योजक यांच्यासाठी ही महत्त्वपूर्ण संधी ठरणार आहे. तज्ज्ञांकडून मार्गदर्शन आणि व्यवसायाच्या गरजेनुसार आर्थिक उपाययोजनाही सुचविण्यात येणार आहेत. सेंट्रल बँक ऑफ इंडियाचे अहिल्यानगर क्षेत्राचे विभागीय प्रमुख नरेश कुमार दुबे यांनी दि, २० नोव्हेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर येथे उद्योजकांना या कार्यक्रमात सहभागी होण्याचे आवाहन केले आहे. उद्योजकांनी या संधीचा लाभ घेऊन आपल्या व्यवसायाच्या प्रगतीसाठी पुढाकार घ्यावा, असे आवाहन बँकेच्या वतीने करण्यात आले आहे.

वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त शिवसैनिकांकडून विनम्र अभिवादन



अक्षराज : बालासाहेब फुलपगार

दि.१७, पालम (परभणी) : शिवसेनाप्रमुख वंदनीय हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त पालम येथे त्यांच्या प्रतिमेस अभिवादन करून विनम्र आदरांजली अर्पण करण्यात आली. यावेळी शिवसेनेचे उपजिल्हाप्रमुख बाळासाहेब लोखंडे, शिवाजीराव दिवटे, भानुदासराव कराळे, बाबुराव शिनगारे, प्रमोद भुसनर, ओमकार माडे, नागनाथ शिनगारे, तुकाराम कराळे, नागोराव कराळे यांच्यासह शिवसैनिक व पदाधिकारी उपस्थित होते.यावेळी उपस्थितांनी वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतींना उजाळा देत त्यांच्या विचारांना अभिवादन केले. त्यांच्या हिंदुत्ववादी विचारांचा आणि शिवसेनेच्या संघर्षमय वाटचालीचा वारसा पुढे नेण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

आठवणी बाळासाहेबांच्या,निर्धार शिवसेनेचा; सोलापूर युवासेनेकडून अभिवादन



अक्षराज : साहेबराव परबत

दि.१७, सोलापूर : हिंदुहृदयसम्राट, शिवसेनाप्रमुख वंदनीय बाळासाहेब ठाकरे यांच्या स्मृतिदिनानिमित्त युवासेना सोलापूर जिल्ह्याच्यावतीने अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या पवित्र स्मृतींना विनम्र अभिवादन करण्यात आले.युवासेनेचे सोलापूर जिल्हाप्रमुख राम वाकसे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. याप्रसंगी युवासेनेचे सोलापूर शहरप्रमुख तुषार आवताडे आणि रणजीत चौधरी यांची प्रमुख उपस्थिती होती.बाळासाहेब ठाकरे यांनी आपल्या संपूर्ण आयुष्यात मराठी माणसाच्या हक्कांसाठी, अस्मितेसाठी आणि हिंदुत्वाच्या विचारांसाठी संघर्ष केला. त्यांच्या बुलंद नेतृत्वाने महाराष्ट्राच्या राजकारणाला नवी दिशा दिली. अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्याची धम क, सर्वसामान्यांच्या प्रश्नांसाठी लढण्याची जिद्द आणि कार्यकर्त्यांमध्ये निर्माण केलेली संघटनात्मक ऊर्जा आजही शिवसैनिकांसाठी प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प यावेळी उपस्थित युवासैनिकांनी व्यक्त केला.या अभिवादन कार्यक्रम ला युवासेनेचे सोलापूर शहर उत्तर विधानसभा समन्वयक गोरख कणसे, मध्य विधानसभा चिटणीस प्रकाश नाईकवाडी, कॉलेज कक्षचे समर्थ गायकवाड, अभिषेक मॅकल, दिगंबर मल्लाव, भीमसिंग खंडेवाले, गणेश बनसोडे, जयसिंगराव भोसले, अरमान बक्षी, रणजीत दिल्लीवाले आदी युवासैनिक उपस्थित होते.बाळासाहेब ठाकरे यांचे विचार, संघर्षाची परंपरा आणि शिवसेनेची संघटनात्मक ताकद नव्या पिढीपर्यंत पोहोचवण्याचा निर्धार यावेळी युवासैनिकांच्या उपस्थितीत अधोरेखित झाला.बाळासाहेबांचे विचार हेच प्रेरणास्थान आणि त्यांचा संघर्ष हाच पुढील वाटचालीचा मार्ग, अशा भावनेतून उपस्थितांनी आपल्या लाडक्या शिवसेनाप्रमुखांना अभिवादन केले.

घणसोली येथील अनधिकृत बांधकामावर नमुंमपा व सिडकोकडून संयुक्त कारवाई

अक्षराज : जे.के.पोळ

दि.१७, नवी मुंबई : महापालिकेच्या अतिक्रमण विभागाच्या वतीने नोटीस देऊनही संबधितांनी नोटिशीची दखल न घेतल्यामुळे अनधिकृत बांधकामाविरोधात नवी मुंबई महानगरपालिका विभागामार्फत आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या निर्देशानुसार व अतिरिक्त आयुक्त (२) डॉ. राहुल गेठे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विभागाने घणसोली विभागात निष्कासनाची कारवाई करण्यात आली.

नवी मुंबई महानगरपालिका विभाग कार्यालयक्षेत्रातील हैदरअली मंडल (विकासक), से.१६, तळवली, सर्व्हे नं.१७५, मुख्य रस्त्यालगत, घणसोली, नवी मुंबई. व दीपक जैन (विकासक) सेक्टर २१ घणसोली यांनी नवी मुंबई महानगरपालिकेची कोणतीही पुर्वपरवानगी न घेता अनधिकृत बांधकाम सुरू केले होते. सदरील अनधिकृत बांधकामांस घणसोली विभागामार्फत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ मधील कलम ५४ अन्वये नोटीस बजाविण्यात आलेली होती. संबंधितांनी केलेले अनधिकृत बांधकाम स्वत:हून हटविणे आवश्यक होते. परंतू त्यांनी सदर ठिकाणी अनधिकृत बांधकाम सुरू ठेवलेले होते.

सदर अनधिकृत बांधकामावर नवी मुंबई म हानगरपालिका व सिडको यांच्यामार्फत संयुक्त कारवाई करण्यात आली. यासाठी २ पोकलेन मशीन, ३५ ब्रेकर, ५० कामगार, सुरक्षारक्षक, अतिक्रमण विभागाकडील पोलिस बंदोबस्त, स्थानिक पोलिस बंदोबस्त तसेच सिडको व नवी मुंबई महानगरपालिका अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सदरील अनधिकृत बांधकाम



ावर निष्कासन कारवाई करण्यात आली. यापूढे देखील अशा प्रकारे कारवाई तीव्र स्वरुपात करण्यात येणार आहे.

आ. विजय वडेट्टीवार यांच्या पुढाकारातून दुर्धर आजारग्रस्त कुटुंबांना आर्थिक सहकार्य

'वसा जनसेवेचा... रुग्णसेवा हीच खरी पुण्यसेवा !' या विचारातून माणुसकीच्या नात्याला मदतीचा हात

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१७, सिंदेवाही (चंद्रपूर) : समाजातील गरजू, निराधार आणि दुर्धर आजारांनी ग्रस्त असलेल्या कुटुंबांच्या दुःखात सहभागी होऊन त्यांच्या अडचणीच्या काळात मदतीचा हात पुढे करणे, हीच खरी लोकसेवा आहे. संतांच्या मानवतावादी शिकवणुकीवर आणि रुग्णसेवा हीच खरी पुण्यसेवा या विचारावर विश्वास ठेवत दिनांक १४ नोव्हेंबर २०२६ रोजी आ. विजय वडेट्टीवार (गटनेते, विधिमंडळ, महाराष्ट्र राज्य) यांच्या पुढाकारातून सिंदेवाही येथील दुर्धर आजारांनी ग्रस्त कुटुंबांना सहकार्य करण्यात आले.

सिंदेवाही नगरपंचायत क्षेत्रातील प्रभाग क्रमांक १४ मधील कायम रहिवासी सुनीता अंबादास नैताम या कर्करोगासारख्या गंभीर आजाराने ग्रस्त असून त्यांची प्रकृती अत्यंत चिंताजनक आहे. त्याच प्रभागातील आशाबाई दिवाकर पुस्तोडे यांनाही कर्करोगासारख्या दुर्धर आजाराने ग्रासले आहे. तसेच प्रभाग क्रमांक १६ मधील देविका मनोहर ठाकरे याही गंभीर आजाराने त्रस्त होत्या. दुर्दैवाने त्यांचे नुकतेच निधन झाले. अशा कठीण परिस्थितीत त्यांच्या कुटुंबावर कोसळलेले दुःख आणि निर्माण झालेली आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती अत्यंत वेदनादायी आहे. या तिन्ही कुटुंबांच्या परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन आ. विजय वडेट्टीवार यांनी संवेदनशीलतेने पुढाकार घेत आवश्यक सहकार्य उपलब्ध करून दिले. त्यांच्या या सहकार्यामुळे संकटग्रस्त कुटुंबांना काही प्रमाणात आर्थिक आधार आणि मानसिक बळ मिळाले. यावेळी आ. विजय वडेट्टीवार यांच्या वतीने शहर काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष सुनील उट्टलवार, सहकार नेते मधुकर बोरकर, नगरसेवक युनुसभाई शेख, उपाध्यक्षा पूजाताई रामटेके, नगरसेवक पंकज नन्नेवार आणि संचालिका जयश्रीताई नागापुरे यांच्या हस्ते संबंधित कुटुंबांना सहकार्य करण्यात आले.



याप्रसंगी मृणाल (गोलू) मस्के, अंबादास नैताम यांच्यासह काँग्रेसचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर उपस्थित होते.

माणुसकीचे खरे सौंदर्य हे केवळ शब्दांत नसते, तर संकटाच्या काळात एखाद्याच्या दुःखात सहभागी होऊन त्याला आधार देण्यात असते. आजारपणाशी लढणाऱ्या रुग्णांना केवळ औषधोपचारांचीच नव्हे, तर त्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदतीची, मानसिक आधाराची आणि आपुलकीच्या दोन शब्दांचीही गरज असते. अशा वेळी लोकप्रतिनिधींनी संवेदनशीलतेने पुढे येऊन केलेले सहकार्य निश्चितच समाजासाठी प्रेरणादायी आहे. लोकप्रतिनिधित्व म्हणजे केवळ पद, सत्ता अथवा राजकीय जबाबदारी नव्हे, तर सामान्य माणसाच्या अडचणीच्या वेळी त्याच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याची सामाजिक बांधिलकी होय. आ. विजय वडेट्टीवार यांच्या माध्यमातून करण्यात आलेले हे सहकार्य त्याच सामाजिक जाणिवेचे आणि माणुसकीच्या नात्याचे प्रतीक आहे.

कन्हाळगाव अभयारण्य रद्द नको, व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा द्या; प्रा.चोपणे यांची मुख्यमंत्री यांच्याकडे मागणी

अक्षराज : वसंत वडस्कर

दि.१७, चंद्रपूर : ताडोबा व्याघ्र प्रकल्प आणि तेलंगणातील ुरावा कवल व्याघ्र प्रकल्प यांना जोडणारा महत्वाचा वन्यजीव भ्रमणमार्ग असलेल्या कन्हाळगाव अभयारण्याचा दर्जा रद्द करण्याऐवजी त्याला व्याघ्र प्रकल्प म्हणून घोषित करावे, अशी मागणी पर्यावरण अभ्यासक तथा ग्रीन प्लॅनेट सोसायटीचे अध्यक्ष प्रा.सुरेश चोपणे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. कन्हाळगाव परिसराचे वन्यजीव आणि पर्यावरणीय महत्व लक्षात घेऊन १५ मार्च २०२१ रोजी २६९.४० चौरस किलोमीटर क्षेत्राला महाराष्ट्रातील ५० वे वन्यजीव अभयारण्य म्हणून मान्यता देण्यात आली होती. हा परिसर ताडोबा, तेलंगणातील कवल, गडचिरोली आणि इंद्रावतीच्या वनक्षेत्रांना जोडणारा महत्वाचा वन्यजीव भ्रमणमार्ग असल्याचे प्रा. चोपणे यांनी निवेदनात म्हटले आहे. २०१४-१५ मध्ये तत्कालीन राजुरा आमदार आणि तत्कालीन वनमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे या परिसराला अभयारण्य घोषित



करण्यासाठी पाठपुरावा केला होता. त्यावेळी तत्कालीन वरिष्ठ अधिकारी प्रवीण परदेशी यांनीही सकारात्मक भूमिका घेतली होती. आ. संजय धोटे यांचाही या प्रक्रियेला पाठिंबा होता. त्यामुळे आता अभयारण्य रद्द करण्याची मागणी करण्याऐवजी त्याचा विस्तार आणि व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळविण्यासाठी प्रयत्न व्हावेत, असे आवाहन त्यांनी केले आहे. कन्हाळगाव परिसरात सुमारे २० वाघ, शेकडो वन्यजीव प्रजाती, बारमाही पाण्याचे झरे, महत्वाच्या वृक्षप्रजाती आणि सुमारे १५ कोटी वर्षापूर्वीचे लाकडाचे जिवाश्म आढळतात. घनदाट जंगल आणि तुलनेने कमी गावांची वस्ती यामुळे हा परिसर जैवविविधतेच्या दृष्टीने महत्वाचा असल्याचे त्यांनी नमूद केले आहे. कन्हाळगावला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा मिळाल्यास पर्यटनाला चालना मिळेल. स्थानिक तरुणांना जिप्सी, पर्यटक वाहतूक, दुकाने आणि अन्य व्यवसायांच्या माध्यमातून रोजगार उपलब्ध होऊ शकतो. गावांच्या आर्थिक विकासालाही हातभार लागेल. त्याचबरोबर वनसंवर्धन, वन्यजीव संरक्षण आणि पर्यावरणाचा समतोल राखण्यास म दत होईल, असे निवेदनात म्हटले आहे. या परिसरात खाण प्रकल्पांचे प्रस्ताव तसेच यापूर्वी विमानतळाचा प्रस्ताव चर्चेत असल्याने अभयारण्याच्या संरक्षणाबाबत चिंता व्यक्त करण्यात आली आहे. चंद्रपूर जिल्ह्यात पूर्वी सुमारे ५२ टक्के असलेले वनक्षेत्र आता ३० टक्क्यांवर आल्याचा दावाही प्रा. चोपणे यांनी केला आहे. त्यामुळे उर्वरित वनसंपदेचे संरक्षण करण्यासाठी शासन, लोकप्रतिनिधी आणि पर्यावरण संस्थांनी पुढाकार घेण्याची गरज त्यांनी व्यक्त केली आहे. कन्हाळगाव अभयारण्य रद्द करण्याऐवजी त्याला व्याघ्र प्रकल्पाचा दर्जा देवून स्थानिक गावांच्या विकासाला प्राधान्य द्यावे, अशी आग्रही मागणी प्रा. सुरेश चोपणे यांनी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.